# नाशिक महानगरपालिका, नाशिक
## जनसंपर्क विभाग : कोटेशन नोटीस

नाशिक महानगरपालिका जनसंपर्क विभागासाठी अद्यायावत कॅमेरा पुरविणेकामी अधिकृत विक्रेता/पुरवठादार यांचेकडून दरपत्रक (कोटेशन) मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | तपशिल | अंदाजे प्राकलन |
|---|---|---|
| १) | निकॉन डी-५३०० कॅमेरा<br>व्हिडीओ मोडसह, सोबत लेन्स-१८-१४०, निकॉन फ्लॅश सुविधेसह. | र.रु.७५,०००/- |

**अटी/शर्ती**

१) जनसंपर्क विभागासाठी लागणारा वरीलप्रमाणे कॅमेरा तातडीने खरेदी करावयाचा असल्याने अधिकृत विक्रेते / पुरवठादार यांनी वाहतूक इत्यादी सर्व करासह दर नमूद करावेत.

२) सदरचे साहित्याचे अधिकृत डिलर असलेबाबतचे प्रमाणपत्र/पुरावा कोटेशन सोबत जोडणे आवश्यक आहे.

३) सशर्त कोटेशनचा विचार केला जाणार नाही. ज्या कोटेशनधारकाचे कोटेशन मंजूर करण्यात येईल. त्यांना र.रु.१२०/- चे जनरल स्टॅम्पवर मनपाचे लाभात करारनामा करुन द्यावा लागेल.

४) कोटेशन सोबत शॉपॲक्ट किंवा इतर शासकीय ठिकाणी व्यवसायाची नोंदणी केली असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र सोबत जोडण्यात यावे.

५) सदरचे दरपत्रक सोबतचे विहित नमुन्यात सादर करणे आवश्यक राहील. तसेच सदर दरपत्रका समवेतच्या अटीशर्ती मान्य असलेबाबत अटीशर्ती नमुन्यावर स्वाक्षरी करुन कोटेशन सोबत जोडणे आवश्यक राहील.

६) सदरचे कोटेशन लिफाफा जनसंपर्क विभाग, राजीव गांधी भवन, शरणपुररोड, नाशिक यांचेकडेस दिनांक ०८/०१/२०१६ ते दिनांक १५/०१/२०१६ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत सादर करावा. विलंबाने प्राप्त झालेले कोटेशन लिफाफे स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

७) सदरचे कोटेशन अटीशर्तीमध्ये नविन शर्तीचा समावेश करणेचा किंवा सदरचे अटीशर्तीत तातडीची बाब म्हणून सवलत देण्याचा निम्न स्वाक्षरीकार यांना अधिकार राहील.

८) कोणतेही कोटेशन स्विकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार निम्न स्वाक्षरीकार यांचा राहील.

९) पुरवठा आदेश मिळालेपासून संपुर्ण मालाचा पुरवठा सात दिवसांचे आत किंवा तत्पुर्वी करणे बंधनकारक राहील.

ठिकाण : नाशिक

दिनांक : ०८/०१/२०१६

Sd/-

**उपआयुक्त(स्था.सं.क.)**

**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

**नाशिक महानगरपालिका,नाशिक**
**जनसंपर्क विभाग**
**सर्वसाधारण अटी शर्ती (कोटेशन)**

१) कोटेशन सोबतची कोटेशनधारकाची अट मान्य करता येणार नाही. सशर्त कोटेशन तात्काळ रद्द करण्यात येईल.

२) कोटेशन नोटीस मध्ये नमुद केलेली कॅमेऱ्याची व त्या सोबत असणाऱ्या वस्तुंची संख्या नमुद करण्यात आली आहे.

३) दिलेल्या मुदतीतमध्ये कॅमेऱ्याचा पुरवठा व इतर कॅमेऱ्यासाठी लागणाऱ्या वस्तु पुरविणे आवश्यक आहे. काही अपरीहार्य कारणास्तव कॅमेरा व इतर वस्तुंचा पुरवठा करणे शक्य नसल्यास तशी मुदतवाढ मिळणे बाबतचा आगाऊ अर्ज करणे आवश्यक राहील. तथापी मुदतवाढ द्यावयाची किंवा कशी याबाबत महापालिकेचा निर्णय अंतीम राहील.

४) ज्या संस्थेचे /पुरवठदाराचे कोटेशन मंजुर होईल त्या कोटेशनधारकास महानगरपालिकेच्या लाभात र.रु.१२०/-च जनरल स्टॅम्पचे रितसर करारनामा करुन द्यावा लागेल. तसेच सक्षम जामीनदार द्यावा लागेल.

५) कोटेशन धारकाच्या कोणत्याही टॅक्सची जबाबदारी महानगरपालिकेवर रहाणार नाही.

६) मुदतीत कॅमेरा व कॅमेऱ्यासाठी लागणाऱ्या वस्तुंचा पुरवठा वेळेत न केल्यास दर दिवसाला १/- रु.प्रमोणे दंड आकारणी करण्यात येईल.

७)मुदतीत कॅमेरा व त्या साठी लागणाऱ्या वस्तुंचा पुरवठा न झाल्यास कॅमेरा व त्यासाठी वस्तु इतर ठिकाणाहुन खरेदी करण्यात येईल. त्या खरेदीस महानगरपालिकेस मंजुर दरापेक्षा जास्त खर्च आल्यास तो कोटेशन धारकाकडुन वसुल करण्यात येईल.

८) मंजुर कोटेशन धारकाकडुन कॅमेरा व इतर वस्तु खरेदी करण्याची सक्ती मनपावर रहाणार नाही.आाणि कोटेशन धारकास नुकसान भरपाई मागता येणार नाही

९)मंजुर नमुन्याप्रमाणे/स्पेसिफिकेशन प्रमाणे मालाचा पुरवठा न झाल्यास /काम कोटेशनधारकाचे जबाबदारी इतर ठिकाहून करुन घेण्यात येइल. आणि त्या खरेदीस महानगरपालिकेस मंजूर दरापेक्षा जास्त खर्च आल्यास तो कोटेशनधारकाकडून वसुल करण्यात येईल.

१०) मंजूर नमुन्याप्रमाणे/स्पेशिफिकेशनप्रमाणे मालाचा पुरवठा न झाल्यास/काम न झाल्यास सदरचा माल परत करण्यात येईल अथवा सेवा नाकारण्यात येईल व त्याबाबतचा महानगरपालिकेचा निर्णय अंतिम राहील.

११) कोणताही माल मंजूर केलेल्या दराने कोटेशनधारकाकडून खरेदी करणची महानगरपालिकेवर सक्ती नाही व यबाबत कोटेशनधारकास नुकसान भरपाई मागता येणार नाही.

१२) अटी/शर्तीमधील एखाद्या शर्तीबाबत काही सवलत देणे अथवा आवश्यक अशा काही जादा अटी घालण्याबाब महानगरपालिकेस अधिकार राहील.

१३) कोटेशन दर मंजूर झालेनंतर सदरच्या कॅमेरा खरेदीच्या दरात काही वाढ झाल्यास वाढलेल्या दराप्रमाणे कोटेशनधारकास जादा पैसे मिळणार नाही.

१४) पुरवठाधारकाने अटीशर्तीचा भंग केल्यास त्यांचे बिलातून रक्कम जप्त करण्यात येईल.

Sd/-
उपआयुक्त(स्था.सं.क.)
नाशिक महानगरपालिका, नाशिक

सदरचे अटीशर्ती मी वाचल्या असून सदरच्या अटीशर्ती मला मान्य व कबूल असून त्याप्रमाणे माल पुरविण्यास/सेवा पुरविण्यास/काम करण्यास मी तयार आहे.

(कोटेशन धारकाची स्वाक्षरी)